महावितरण

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/अ/ ९१६९

दिनांक : 22 / 3 / 2011

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबत.

संदर्भ : सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३६६९० दि.०४/१२/२०१०.

***********

क्षेत्रीय कार्यालयामार्फत कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता दिसून येत नाही. तसेच विविध ठिकाणी वेगवेगळे वेतन देण्यात येते. त्यामुळे संदर्भीय परिपत्रकान्वये किमान वेतनाबाबत सविस्तर मार्गदर्शन क्षेत्रीय कार्यालयांना करण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रकामध्ये परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि. २८/०९/२०१० ते ३१/१२/२०१० या कालावधीकरिता दिलेले होते. विशेष भत्ता दराचे परिपत्रक मा. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकूल, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून निर्गमित झाल्यानंतर त्यास सांघिक कार्यालयाकडून परिपत्रकाद्वारे पुढील कालावधीसाठी प्रसिध्दी देण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम - १९४८ मुंबई यांनी दि. ०४/०२/२०११ च्या आदेशान्वये दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि.०१/०१/२०११ ते ३०/०६/२०११ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत. मा. कामगार आयुक्त, मुंबई यांच्या दि.०४/०२/२०११ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | ४९१.४० | ४९१.४० | ४९१.४० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत विविध उद्योगातील रोजंदारी कामगाराकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना दि.०१/०१/२०११ ते ३०/०६/२०११ या कालावधीकरिता लागू आहेत. तरी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबतची अंमलबजावणी करावी.

किशोर पवार
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत : प्रेषण यादीप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तराप्यंत.

E:\Backup Of Meena\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc